म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २४४०



# असे हे शिवराय!

चरितकाव्य

कवी
कुमार महेश भागवत

V.B. Potdar

संदर्भ काव्य
23८96

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

दा.क्र. काव्य
ता. १०/२/८२

# प्रस्तावना

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरित्रावरील व्याख्याने रसाळ, रंजक व स्फूर्तीशाली असतात. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण विशेष हे की या व्याख्यानांनी एका बालशाहिरास काव्य रचनेची प्रेरणा मिळाली आणि व्याख्यानातील विषयाचे सूत्र अचूक पकडून, जणू एका झपाटलेल्या अवस्थेत त्याने अवघ्या १२५ कडव्यांत शिव जन्मापासून तो शिव-निर्वाणापर्यंतचा अवघा इतिहास काव्यबद्ध केला, ही खचितच कौतुकास्पद आणि स्पृहणीय बाब म्हणावी लागेल. या काव्यरचनेत कांहीसा नवखेपणा जाणवला तरी कुठेही बालसुलभ बालिशता जाणवत नाही !

इतिहासाचें व कालसंगतीचे भाव कुठेही सुटू न देता, बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या शाहिरीतील उत्कटता या पांचशे ओळीमध्ये अवतरली आहे. ती पाहून, "ही कवने एका चौदा वर्षाच्या शाळकरी पोरानें लिहिली आहेत", हे कोणास खरेही वाटणार नाही.

स्वातंत्र्य-पारतंत्र्य, धर्म-अधर्म या संकल्पनांची जाण आणि त्यांचे मोल जाणण्याचे वस्तुत: त्याचे वय नव्हे. म्हणून शिवचरित्राचे या संकल्पनांशी नाते जोडण्याचा प्रयत्न केल्याबद्दल महेश भागवतचे कौतुक केले पाहिजें.

शिव जन्माचे वर्णन करताना हा बालकवी म्हणतो-

शिवनेरीच्या उदयाचली
त्या दिनी भास्कर आला,
त्या अंधारात एक
प्रकाश किरण उजळला ॥

तो अंधार पारतंत्र्याचा,
ती निशा अधर्माचीं
तो किरण स्वराज्याचा,
ती पहाट स्वधर्माची ॥

शिवाजी महाराजांच्या जन्मकालीन परिस्थितीचे हे वर्णन केवळ समर्पकच नव्हे, तर परिपक्वही आहे.

पावनखिंडीतील बाजीप्रभूची शर्थ, सुरतेवरींल स्वारी, अफझलखानाचा वध, सिंहगडचा विजय आणि तानाजीचे बलिदान, आगऱ्याहून सुटका, महाराजांचा

······मलपृष्ठ ३ वर

संदर्भ काव्य
२३४९७

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ. मा. प.)
५०००-४-८०

वा.क्र. काव्य
१०/२१८२

# 'असे हे शिवराय'

## –चरित काव्य

कवी :
कु. महेश बाळकृष्ण भागवत

प्रकाशक :
सौ. सुनंदा बाळकृष्ण भागवत
राणे यांचे घर,
सारस्वत कॉलनी,
डोंबिवली (पूर्व)
४२१२०१

मुखपृष्ठ :
श्री. व्यंकटेश पोतदार

मुद्रक :
श्री समर्थ प्रिंटींग प्रेस, ठाणे.

मुखपृष्ठ मुद्रण :
मल्टि प्रिंट पॅक प्रॉडक्टस्
डोंबिवली (पूर्व)

मूल्य : एक रुपया पन्नास पैसे

# निवेदन

चालू वर्षाच्या (१९८१) प्रारंभी जानेवारी महिन्यात डोंबिवली येथे शिवशाहीर श्रीयुत बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'शिवचरित्र कथन माले'चे दुसरे सत्र झाले. दररोज निष्ठेने आणि एकाग्रतेने ऐकत असतांना चि. महेशने स्फूर्ती घेतली आणि हे दीर्घकाव्य त्याने केवळ चार दिवसात रचून–लिहून काढले. श्री. बाबासाहेबांना ते दाखवले असता कार्यक्रम संपवून डोंबवलीहून कूच करण्यापूर्वी त्यांनी आवर्जून आशिर्वादपर असा अभिप्राय लिहून दिला.

आता हेच चरितकाव्य छापील स्वरूपात महाराष्ट्रातील शिवभक्त रसिकांसमोर आणतांना धन्यता वाटत आहे. यावेळी कौतुकाच्या भावनेने पण विवेचक अशी प्रस्तावना विख्यात पत्रकार, कवी व रसिकाग्रणी श्री. विद्याधर गोखले यांनी लिहून दिली. त्यांना मी मनःपूर्वक धन्यवाद देते. अभिप्राय छापण्यास अनुमती दिल्याबद्दल आणि प्रकाशन आपल्या शुभहस्ते करण्याचे आनंदाने मान्य केल्याबद्दल शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे ऋण फारच मोठे आहे. श्री. आप्पासाहेब दांडेकर आणि चि. महेश शिकत आहे त्या स. वा. जोशी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. जाधव यांनी आशिर्वाद दिल्याबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

आमच्या कुटुंबाचे मित्र श्री. व्यंकटेश पोतदार यांनी थोड्या वेळात पण कलात्मक असे मुखपृष्ठ तयार करून दिले. आमच्या कौटुंबिक संबंधांमुळे आभार मानलेले ते स्वीकारणार नाहीत. तरीही त्यांचे ऋण मान्य करण्याएवढे आहेच. पुस्तकाची छपाई सुबक करून देणारे समर्थ प्रेस, ठाणेचे श्री. वि. स. जोशी आणि मुखपृष्ठ छपाईकरिता मल्टि प्रिन्ट पॅक प्रॉडक्टस्, डोंबिवलीचे श्री. प्रभाकर इनामदार यांना मी धन्यवाद देते.

शिरूर येथील शिवभक्त प्रा. श्री. सुहास जोशी आणि चि. महेशचे कौतुक करणारे अन्य अनेक सुहृदजन अशा सर्वांचेच ऋण मान्य करून हे निवेदन पूर्ण करते.

या क्षणी चि. महेशची आई म्हणून जी धन्यता मी अनुभवत आहे तिला सीमा नाही !

**— सौ. सुनंदा बाळकृष्ण भागवत**

# ‘असे हे शिवराय’

(चरित काव्य)



॥ श्री ॥

वंदितो मी गणरायाला
आणि वंदितो भवानी मातेला
थोडेबहुत लिहिणे आहे
स्फूर्ती द्यावी महेशाला ॥१॥

शिवनेरीच्या उदयाचली
त्या दिनि भास्कर आला
त्या अंधारात एक
प्रकाश किरण उजळला ॥२॥

तो अंधार पारतंत्र्याचा
ती निशा अधर्माची
तो किरण स्वराज्याचा
ती पहाट स्वधर्माची ॥३॥

बघून पुत्राचे रुपडे
जिजाऊ मनी आनंदली
एकटक बघे त्याकडे
स्वप्ने साकार जाहली ॥४॥

शिवराय मोठे होताच
करी प्रारंभ शिकविण्यास
बालक अभिमन्यूस
बघे ती शिवरायात ॥५॥

पूर्वजांच्या गोष्टी ऐकून
त्याच्या अंगात वीरश्री आली,
बादशहाच्या छळांनी
त्याच्या डोळयात लंका जळाली ॥६॥

लुटुपुटीच्या लढायांनी
शिवनेरी दुमदुमला
आणि सह्याच्या गुहेत
महाराष्ट्र केसरी गर्जला ॥७॥

जणु तो सांगे सर्वांस
तुमचा वाली आला
ती गर्जना ऐकून
शहाजीस आनंद झाला ॥८॥

शिकवावे राजकारण
वाटले बालशिवाजीला
त्यासाठी त्यानें दादोजींना
धाडिले मग पुण्याला ॥९॥

दादोजी होते शूर
चतुर आणि बुध्दिमान
अमृतापरि शिकवण देउनी
शिवरायाचे जोपासले गुण ॥१०॥

उचलून बेलभंडार
आण घेतली स्वराज्याची
कापून करंगळी पिंडीवर
धार धरली रुधिराची ॥११॥

घेऊन तोरणगड
वांधिले स्वराज्याचे तोरण
या सर्व पराक्रमास
सर्वस्वी माउलीच कारण ॥१२॥

नंतर घेतला राजगड
केली राजधानी स्वराज्याची
मिळाली संपत्ती तोरण्यास
झाली कृपा भवानीची ॥१३॥

नंतर घेतला रायरी
होता अभेद्य जरी
उन्मत्त चंद्ररावास
समशेर दाखवली खरी ॥१४॥

समर्थांनी पत्र लिहिले
राजा शिवाजीला
अन् मराठ्यांच्या राजाला
असामान्य गुरु भेटला ॥१५॥

जणु आकाशानेच पत्र लिहिले
अथांग महासागराला
किंवा दैवी तेजाने लिहिले
धैर्याला, पराक्रमाला ॥१६॥

समर्थांनी प्रसाद दिला
आणि अनुग्रह दिधला
असा गुरु लाभला म्हणून
शिवरायांना अभिमान वाटला ॥१७॥

शिवबाच्या सर्व उद्योगांनी
माजला हाहा:कार
बडीसाहिबा पुसे सवाल
होऊनिया चिंतातूर ॥१८॥

शिवाजीच्या अंतासाठी
पसरली स्तब्धता दरबारी
बेगमेची नजर फिरे
त्या सर्व सरदारांवरी ॥१९॥

अफजुलखान उठला
सर्वांपुढती आला
अन् विडा त्याने उचलला
मारायला शिवाजीला ॥२०॥

तो सह्याचा केसरी
बसे प्रतापगडावर
समजून त्याला उंदीर
खान येई घाटावर ॥२१॥

शिवराय झाले चिंतातूर
तोच समर्थांचे पत्र आले
त्यांच्या अमूल्य सल्ल्याने
राजे चिंतामुक्त झाले ॥२२॥

खान येई भवानीजवळ
अन् करी तो जाळगोळ
तरीही शिवराय
नाही गेले त्याजवळ ॥२३॥

भेट ठरवली खानाशी
प्रतापगडाच्या पायथ्याशी
आपले सैन्य लपवून
ठेवले त्यांनी वनराजीशी ॥२४॥

जाहली भेट खानाशी
मारली मिठी मृत्यूला
खुपसून बिचवा राजांनी
उन्मत्ताचा अंत केला ॥२५॥

जणु एका हत्तीच्या
शिरली मुंगी कानात
तसेच या शिवाजीने
अफजुलवर केली मात ॥२६॥

आला सय्यद बंडा नंतर
करे तो राजांवर वार
पण जिवा महाल्यावर
होती राजांची मदार ॥२७॥

मग खानाच्या सैन्यात
उडे बहुत हलकल्लोळ
राजांच्या छोटचा सैन्याने
केली त्यांची पळापळ ॥२८॥

हजारोंची झाली कत्तल
मुंग्याप्रमाणें ते मेले
अशा या पराक्रमाने
राजे समाधानी जाहले ॥२९॥

गेली बातमी विजापुरी
शहा रागावला खूप जरी
परी गप्प बसले नाही
शिवराय त्यानंतरी ॥३०॥

एकेक गड जिंकित
केला राज्याचा विस्तार
अन् याच्यात नेताजीने
लावला मोठा हातभार ॥३१॥

नंतर आला रूस्तमेजमान
सैन्य अवघे दहा हजार
त्यातलेच आठ हजार
गेले होते खाऊन मार ॥३२॥

या सैन्यावर मग
गेला चालून नेताजी
त्यांच्यामधील फाजलला
वाटले हाच शिवाजी ॥३३॥

मग या भ्रमामुळे
जाई तो पळून
इतर सैन्यही जाई
तसेच घोडे टाकून ॥३४॥

त्यानंतर बादशहाने
पाठविले जोहरला
परत एक दानव आला
स्वातंत्र्य गिळायला ॥३५॥

गेले राजे पन्हाळगडीं
सिद्दी आला त्यांमागुती
टाकिला वेढा त्यानें
त्या गडाच्या सभोवती ॥३६॥

सिद्दी वारंवार
हल्ले करी गडावर
परंतू हाती येईना
तो स्वराज्याचा केसरी ॥३७॥

सिद्दीने मग ठरविले
घ्यायची मदत इंग्रजांची
काळ ओळखून त्या धूर्तांनी
केली मदत तोफांची ॥३८॥

करार मोडून त्यांनी
केला विश्वासघात
त्यामुळे राजांवर
झाला मोठा आघात ॥३९॥

महाराज रागावले खूप
गाठ मारली मनात
सुटल्यानंतर मग
दाखवू आपण यांना हात ॥४०॥

सुरू जाहला पावसाळा
धारांत न्हाला पन्हाळा
धावू लागले नद्या-नाले
तुडुंब भरून जळा ॥४१॥

पाऊस सुरू झाल्याने
राजांस हर्ष झाला
अन् मग त्यांच्या मनी
सुटकेचा विचार आला ॥४२॥

नंतर महाराजांनी
केली एक योजना
सुटकेशिवाय त्यांना
दुसरा विचारच सुचेना ॥४३॥

अन् एक पौर्णिमा
ठरविली महाराजांनी
राजें जाणार होते
मृत्यूच्या दाढेतुनी ॥४४॥

पाठविला अपुला त्यांनी
गंगाधरपंत वकील
वातमी पसरवून तो
करी सर्वांस गाफील ॥४५॥

अखेर ती रात्र झाली
राजे उतरले पालखी मधुनी
सर्व आले वेढ्याजवळी
अन् जाऊ लागले त्यामधुनी ॥४६॥

पार करून वेढा
खूप लांब गेले
मग छविन्याच्या तुकडीने
अखेर त्यांना पाहिले ॥४७॥

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

एक साधा न्हावी
त्या पालखीत होता
महाराजांच्या प्राणांसाठी
हसत मरणार होता ।।४८।।

अशा तऱ्हेने फसवून
राजे गेले पुढे
ते सर्व जात होते
बलाढ्य विशाळाकडे ।।४९।।

राजे जातच होते
अन् पहाट झाली
त्यांना पाठीवरची
मोठी फौज दिसली ।।५०।।

खिड आली आणि
गेला पुढे शिवाजी
त्याच्या प्राणांसाठी
लढणार होता बाजी ।।५१।।

घनघोर जाहले युद्ध
केली पराक्रमाची शर्थ
भांडी वाजल्याशिवाय
बाजीचे जीवन व्यर्थ ।।५२।।

अखेर भांडी वाजली
त्याच्या जीवनाचे सार्थक झाले
मग त्याचे पंचप्राण
अनंतात विलीन झाले ।।५३।।

महाराज सुटले सुखरूप
झाला माउलीस आनंद
ते सलामत राहिले अन्
पसरला चहुकडे सुगंध ॥५४॥

पण आधीच राज्यावर
आला होता शाइस्तेखान
त्याचा भाचा औरंगजेबही
देत होता खूप मान ॥५५॥

आला होता खान
पुण्याच्या लालमहालात
तर राजे होते आता
माउलीशी राजगडात ॥५६॥

खानाने पाठविले सैन्यास
कोकणपट्टी जिंकण्यास
मराठ्यांच्या गनिमांमुळे त्यांचा
पुरता चुकला कयास ॥५७॥

याला धडा शिकवू या
असे राजांनी ठरविले
परिस्थिती निरखिण्यास
आपले हेर पाठविले ॥५८॥

मुलीच्या लग्नामुळे
खान गाफील होता
अन् महालातील माळी
बातम्या पोचवीत होता ॥५९॥

राजांच्या आधीच
तयार होते बैल
राजांनी पाहिले
सैन्य होते गाफील ॥६०॥

शिरले राजे सैन्यात
वतावणीने वऱ्हाडाच्या
आले अगदी जवळ
बालपणीच्या महालाच्या ॥६१॥

पाडली दोन खिडारे
आत गेले वेगाने
तोच पाहिले राजांना
त्या शाइस्तेखानाने ॥६२॥

राजे धावले मात्र
आडवा खानाचा मुलगा आला
राजांच्या तलवारीने त्याला
यमसदनास पाठविला ॥६३॥

ही संधी साधून
खान वर आला
बेगमांच्या खोलीत
तो भयाने शिरला ॥६४॥

राजांनी केला पाठलाग
अन् जोरात वार केला
पण खानाचा प्राण
त्याच्या बोटांवरच थांबला ॥६५॥

केला दारुण पराभव
अशा तऱ्हेने खानाचा
झाला हर्ष सर्वांस
मिळालेल्या विजयश्रीचा ॥६६॥

आलें राजांच्या मनात
नुकसान भरपाई घ्यायची
जगातील धनाढ्य अशी
ती सुरतच लुटायची ॥६७॥

झाले हेर रवाना
आली बित्तंबातमी
अन् मग सुरतेवर
गेल्या सेना गनिमी ॥६८॥

तो कुत्ता इनायत
वसे लपून किल्ल्यात
तरीही होता घेत
बेसुमार लाचलुचपत ॥६९॥

उध्वस्त सुरत जाहली
बेसुमार लूट जाहली
जणु रावणाची लंका
मारुतीने भस्म केली ॥७०॥

मधेच इनायतचा वकील
महाराजांकडे आला
शिवरायांच्या खुनाचा
त्याने व्यर्थ प्रयत्न केला ॥७१॥

पण त्याच्या झाल्या चिंध्या
महाराज सुखरूप राहिले
पण या प्रसंगाने
मावळे खूपच चिडले ।।७२।।

या चिडण्याच्या प्रसंगाने
सुरतेची राख झाली
तेव्हाच विझली मराठ्यांच्या
आग ती डोळ्यातली ।।७३।।

महाराज राजगडी सुखरुप
स्वारीवरून परत आले
पण त्यांना वडिलांच्या
मृत्यूचे वृत्त कळाले ।।७४।।

जिजाऊंना दुःख आवरेना
त्या सती जाऊ लागल्या
इतर सर्वांनी त्यांना
खूप विनंत्या केल्या ।।७५।।

नंतर आले राजे
त्यांना लाहयांपरी आसू झाले
माउली न जाण्यासाठी
गळा पडोन रडले ।।७६।।

राजांच्या विनवणीमुळे
माउली गेली नाही
म्हणून सर्वांस हर्ष झाला
त्या तशा दुःखातही ।।७७।।

तेवढ्यात आला एक
सरदार आदिलशाही
पण महाराजांनी त्याची
पर्वाही केली नाही ॥७८॥

त्यांना हवा होता
बाजीराव घोरपडे
म्हणून त्यांनी सरळ
केले कूच त्याच्याकडे ॥७९॥

राजे गेले मुधोळकडे
अन् त्याला ठार मारिले
आपल्या पूज्य वडिलांच्या
आज्ञेचे पालन केले ॥८०॥

एवढ्या पराक्रमाने
राजांनी त्यास मारिले
जणु आपल्या वडिलांचे
रणांगणी श्राद्धच केले ॥८१॥

खवासखानावर पुढे
राजे गेले वेगाने
अवघे विजापूर हादरले
खानाच्या पराभवाने ॥८२॥

महाराजांच्या सैन्यात
झाला सर्वांस आनंद
शहाने ठरवले आता
स्वारी करणे बंद ॥८३॥

राजे मालवणी आले
त्यांसी बेट कुरटे दिसलें
येथे जलदुर्ग बांधू– हे
त्यांच्या मनाने घेतले ॥८४॥

सहा महिन्यातच
बांधून झाला दुर्ग
राजांनी त्याचे नाव
ठेविले सिंधुदुर्ग ॥८५॥

नंतर आले मुघलांचे
दिलेर आणि जयसिंग
मुरारबाजीच्या शौर्याने
त्यांच्या झाला चित्ताचा भंग ॥८६॥

दाखविले आमिष त्यांनी
पण एकनिष्ठ राज्याशी राहिला
नाही दिधला गड पुरंदर
जरी मुरारबाजी गळाला ॥८७॥

पण मग महाराजांनी
तह केला त्यांच्याशी
परत जिंकून घेऊ सर्व
असे ठरविले मनाशी ॥८८॥

चार लक्ष होन मुलूख
अन् दिले तेवीस किल्ले
त्यातील कोंडाण्यामुळे
राजांस फार दुःख झालें ॥८९॥

आले पाहिजे दरबारी
अशी मिर्झाने अट घातली
महाराजांच्या संरक्षणाची
त्यानें पुरी हमी घेतली ॥९०॥

राजे गेले आग्र्यास
आणि पोचले दरबारात
पण बादशहाने मात्र त्यांना
उभे केले मागील लोकात ॥९१॥

शिवराय खूप चिडलें
तडक मुक्कामावर आले
त्यांच्याभोवती बसवून पहारा
बादशहाने त्यांना कैद केले ॥९२॥

बादशहाच्या कपटामुळे
महाराज मनस्वी रागावले
इतर लोकांनी त्यांना
खूप खूप समजावले ॥९३॥

अन् मग शिवरायांनी
आजाराचे ढोंग केले
मौलवींना मिठाई देण्याचे
त्यांनी सत्रच सुरू केले ॥९४॥

हे पहारेकऱ्यांनी पाहिले
त्यांनी पेटारे तपासले
नंतर पहारेकरी ते
तपासायचे कंटाळले ॥९५॥

मग राजांनी ठरविले
मृत्यूच्या ढांगेतुनी जायचे
या कपटी बादशहाला
चांगलेच ठकवायचे ॥९६॥

नंतर एका पेटाऱ्यात
तो केसरी वसला
अन् दुसऱ्या पेटाऱ्यात
त्याचा छावा वसला ॥९७॥

पेटारे जाऊ लागले
अन् हृदयाचा चुकला ठोका
औषधाच्या बतावणीने
हिरोजी-मदारीने साधला मोका ॥९८॥

राजे पोचले सुखरूप
ठेवले मथुरेस संभाजीला
महाराज आलेले बघून
झाला आनंद माऊलीला ॥९९॥

स्वराज्याची जखम ती कोंडाणा
वाटले जिजाऊस जिंकावा
शिवबाने मनीं ठरविले
तानाजीच इथे नेमावा ॥१००॥

पण त्याच्या मुलाचे
रायबाचे होते लग्न
त्याची तयारी करण्यात
तानाजी होता मग्न ॥१०१॥

तो आमंत्रणास आला
अन् ते कळले त्याला
'आधी लगीन कोंडाण्याचे
मग रायबाचे' तो वदला ॥१०२॥

अन् एके दिवशी तो
तडक मोहिमेवर निघाला
फक्त एका दोरखंडावरून
उभा कडा चढला ॥१०३॥

त्याचा नि उदेभानाचा
घनघोर संग्राम जाहला
मध्येच त्याची ढाल तुटली
तर हाताला गुंडाळला शेला ॥१०४॥

दोघांसही मृत्यू आला
पण ते वीरश्रीने लढले
तानाजी पडलेला पाहून
मावळे पळायला लागले ॥१०५॥

'पळता काय, मागे फिरा'
सूर्याजी आडवा आला
त्यामुळेच त्यांच्या हाती
गड कोंडाणा आला ॥१०६॥

तानाजीच्या मरणाचे
महाराजांस आले वृत्त
अन् त्यामुळे त्यांचे
तत्क्षणी भंगले चित्त ॥१०७॥

या वृत्तामुळे त्यांना
फारच दुःख झालें
'गड आला पण सिंह गेला'
असे ते वदले ॥१०८॥

राजांच्या रत्नातील रत्नमणी
होता तो गुजर
अवघ्या सहांसह त्याने
केला देहाचा जोहार ॥१०९॥

अशा तऱ्हेनें शिवरायांनी
कष्टे स्वराज्य घडविले
त्याची महती पटविण्या जगाला
राज्याभिषेक करण्याचे ठरविले ॥११०॥

रायगडास त्यांनी
केली राज्याची राजधानी
चिपळुणास जाऊन त्यांनी
केली सैन्याची पहाणी ॥१११॥

राज्याभिषेकाचे पौरोहित्यासाठी
आणले गागाभट्टांना
खूप मोठा होता मान
काशीक्षेत्रात त्यांना ॥११२॥

महाराज बसले चौरंगावर
झाला जलाभिषेक सप्तसरितांचा
अन् तैसाच अमृतापरी झाला
माऊलीच्या आनंदाश्रूंचा ॥११३॥

हत्तीवरून जाऊन त्यांनी
घेतले दर्शन जगदीश्वराचे
देवा ! यश दे आम्हाला
घेतले व्रत हे स्वराज्याचे ॥११४॥

धन्य ते महाराज
धन्य ती राजमाता
मनी म्हणे शिवबास
तुझी मांडी दे आता ॥११५॥

ते आनंदाचे दिन
फार काळ नाही टिकले
त्या निष्ठुर काळाने
माऊलीस ओढून नेले ॥११६॥

माऊली गेली अन्
महाराजांचे छत्र गेले
ती गेली अन् राजांस
अपरंपार दुःख झाले ॥११७॥

आपण हिंदू नाही याची
होती नेताजीस खंत
त्याची विनंती पाहून त्याला
राजांनी घेतले स्वधर्मात ॥११८॥

अशा या नेताजीस
म्हणत असत प्रतिशिवाजी
रूपाने, गुणाने, शौर्याने
होता जणु तो शिवाजी ॥११९॥

यानंतर महाराजांनी
कर्नाटक स्वारी केली
जिंजीस जाऊन त्यांनी
ती जिंकून घेतली ॥१२०॥

आपल्या सावत्र भावाला
व्यंकोजीला समजावले
पण आपल्या थोर भावाचे
त्याने नाहीच मानिले ॥१२१॥

अशातच संभाजीने
राज्याशी फितुरी केली
अन् त्यामुळे शिवरायांवर
दुःखाची कुऱ्हाडच कोसळली ॥१२२॥

अशा या सर्व दुःखांनी
महाराज खूपच खचले
अन् एक दिवस ते
इहलोक सोडून गेले ॥१२३॥

अवघ्या स्वराज्यातील
रयतेचा वाली गेला
जणु मानससरोवरातील
राजहंस पक्षीच गेला ॥१२४॥

अशा या शिवरायांची
सांगू ती किती मात
बालक महेशाचे त्याला
शत शत प्रणिपात ! ॥१२५॥

卐 卐 卐

# आशिर्वाद---अभिप्राय

कळी उमलत जावी तशी प्रतिभा उमलत जात आहे. या काव्यात श्रीमन्महाराज छत्रपति शिवाजी महाराज यांच्या जीवन-कार्याचा परिमल हळुवारपणे दरवळत आहे. आशा वाटते की ही प्रतिभा प्रगल्भ होईल !

राजते लेखनावधिः॥

श्रीराज शके ३०७
पौष वद्य ४
डोंबिवली.

—बाबासाहेब पुरंदरे

---

या लहान वयात अशी सुघड रचना करायची बुद्धी व्हावी हे एक आश्चर्य आहे. अर्थ असा की देवदत्त प्रतिभा लाभली आहे. आता गरज आहे, ती या देवदत्तावर भरपूर संस्कार कर–ण्याची. तुकाराम वाचावा, ज्ञानोबा वाचावा, मोरोपंत, वामन, रघुनाथ पण्डित–असे प्राचीन आणि कुसुमाग्रज, बोरकरांसारखे अर्वाचीन कवी वाचून टाकावेत, त्यानें काय होईल की अंतरीच्या ईश्वरी प्रज्ञेला हे महाभाग कोणतें वळण देतात, तें ध्यानीं येईल !

इति !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2880
23-8-96
काव्य 9012152
ग्रंथ शाखा

आप्पा दांडेकर
(गोपाळ नीलकंठ दांडेकर)
१०-५-८१

मृत्यू आदी अनेक प्रसंगांचे चित्रण एकाद्या कुशल चित्रकारानें करावे इतक्या सजीवतेने या बालकवीनें केले आहे.

प्रगल्भ बांधेसूद काव्यरचनेचे, कांटेकोर गण–मात्रांचे नियम या बाल शाहिरीला लावणे योग्य होणार नाहीं. चिकित्सक बुद्धीनें या ठिकाणी कोणी तरबेज काव्यसौष्ठव शोधण्याचा प्रयत्न करण्याचेही कारण नाही. कारण हे काव्य म्हणजे प्रतिभेचा एक बाल अंकुर मात्र आहे. त्यावर योग्य ते संस्कार अभ्यास, परिश्रम आणि परिशीलन यांच्या साह्यानें होऊन भावी कालात उत्फुल्ल प्रतिभा–पुष्पांत हा अंकुर विकसित होवो ही सदिच्छा !

शिवचरित्राचे शिवधनुष्य उचलण्याचे धैर्य या बाल–प्रतिभेस व्हावे, यातच तिच्या भविष्यकालीन विकसनाची ग्वाही सामावलेली आहे.

"बालादपि सुकाव्यं ग्राह्यम् !"

– विद्याधर गोखले

---

# पु र स्का र

दि. ४ नोव्हेंबर १९८१

कुमार महेश बाळकृष्ण भागवत हा १४ वर्षे वयाचा विद्यार्थी स. वा. जोशी हायस्कूलचा जून १९७६ पासूनचा विद्यार्थी आहे. त्याला इयत्ता ७ वीत असल्यापासूनच कविता करण्याचा छंद लागलेला आहे. त्याने रोजच्या जीवनातील साध्या साध्या प्रसंगांचे निरीक्षण करून त्यावर कविता लिहिल्या आहेत. त्याच्या कवितांमध्ये घरापासून तो सध्याच्या राजकारणापर्यन्तचे विषय आलेले आहेत. विशेषत: त्याने केवळ १८ जानेवारी १९८१ ते २१ जानेवारी १९८१ या काळात शिवशाहीर श्री. ब. मो. पुरंदरे यांच्या व्याख्यानाचे श्रवण करून श्री शिवाजी महाराजांवर केलेली कविता अत्यंत उत्कृष्ट आहे. काव्यस्फूर्तीच्या देणगीची सर्व बाजूंनी उन्नती होण्यासाठी अधिक वाचन, मनन व लेखनाचा छंद, प्रत्यक्ष अनुभव या गोष्टींची आवश्यकता आहे. या उदयोन्मुख छोटया कवीने आजी–माजी विख्यात कवींचे मनन व अभ्यास करावा आणि आपल्या छंदाला एकमेवाद्वितीय स्थान प्राप्त करून द्यावे, ही सदिच्छा !

**एस. ए. जाधव**

ज. ए. इ. चे स. वा. जोशी हायस्कूल

डोंबिवली (पूर्व), जि. ठाणें